महाराष्ट्र शासन
निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,कागल जि.कोल्हापूर यांचे कार्यालय
धुण्याच्या चावीजवळ,जुनी दारू भटटी,रंकाळा टॉवर
कोल्हापूर ४१६०१२
ईमेल- ipstateexcisekagal@gmail.com

(५९)

क्रमांक डिईटी 112026/ ३८७ /दु.निरी.कागल क्र.3 कोल्हापूर दिनांक. 06/04/2026

प्रति,

मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो,
कागल न्यायालय, ता.कागल
जि.कोल्हापूर.

Exh. 4/C.

प.आ.क्र ७०२१ / इ.आ.क्र
दाखल तारीख ८ / ४ /२०२६
सहाय्यक अधिक्षक
दि. न्या व फौ क स्तर, कागल

(मा.सरकारी अभियोक्ता सो, न्यायालय,कागल यांचे मार्फत सविनय सादर)

Order
------------------
Seen & filed

सादरकर्ता :- दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,कागल क्रमांक 3 (तपास अधिकारी)

विषय :- सीआर नं.8/2026 ,दिनांक 18/01/2026 या गुन्हयात जप्त केलेल्या मोबाईल संच परत देण्याबाबत व गुन्ह्यातील हिरण्या पॅकेजिंग कंपनी सिलबंद असलेबाबत म्हणणे.

संदर्भ :- किरकोळ फौजदारी अर्ज नं. 37/2026 मधील जप्त मुद्देमालाबाबत म्हणणे सादर करणेबाबत.

**महोदय,**

सविनय सादर.

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरून सविनय म्हणणे सादर करण्यात येते की, दि. १८/०१/२०२६ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीच्या आचारसंहितेच्या पार्श्वभुमीवर निपाणी-देवगड राज्यामार्गावरून गोवा राज्यात निर्मित झालेले महाराष्ट्र राज्यात विक्रीकरिता असलेले बनावट देशीदारूची ट्रकमधून तस्करी होणार आहे. अशी खात्रीलायक खबर मिळाल्या वरून दिनांक १८/०१/२०२६ रोजी श्री.ए.आर.नायकुडे, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,कागल, इतर सर्व स्टाफ व दोन पंच असे सर्वजण मिळून खाजगी वाहन क्रमांक MH-४२-AX-७१८४ व क्रमांक MH-१०-CA-३५०१ या दोन खाजगी वाहनाने गुन्हास्थळी जावून अनुक्रमे ७ मध्ये नमूद केलेल्या गुन्हा स्थळ ठिकाणी दारुबंदी गुन्ह्याकामी छापा घातला असता गोवा राज्यात निर्मित झालेले महाराष्ट्र राज्यात विक्री करीता असलेले बनावट मद्य रॉकेट देशीदारू संत्रा व टाटा मोटर्स कंपनीचा मॉडेल १५१२/ एलपीटी क्रमांक MH-४०-CM-२६३५ या ट्रक या साहित्यासह असा अंदाजे एकूण रुपये ६१,१५, ७००/- किंमतीचा मुद्देमाल वरील नमुद अनुक्रमांक ८ मधील अनुक्रमे (१) व (२) आरोपीत इसमांच्या ताबेकब्जातून गोवा राज्यात निर्मित झालेले महाराष्ट्र राज्यात विक्री करीता असलेले बनावट मद्य रॉकेट देशीदारू संत्रा मद्य विक्री करण्याच्या उद्देशाने वाहनातून वाहतुक करत असताना मिळून आले आहेत.अशा प्रकारच्या मद्य सेवनाचा मानवी आरोग्यावरही घातक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अनुक्रमांक ८ मधिल नमुद सर्व इसमांच्यावर महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम १९४९ कलम ६५ (a), (b), (d), (e), ८१, ८३, ९० व १०८, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, ३४१, ३४२, ३४५ (१), ३४६ अन्वये व ट्रेड मार्क ॲक्ट १९९९ चे कलम १०३ व १०४ नुसार गुन्हा नोंद करून प्रीलीमिनरी तपास सुरु केला .

**गुन्हा स्थळ क्रमांक २ (मे.कॅनस पॅकेजिंग प्रा.लि.,घर नं.६२,मरनसपाडा, कुडाईम, गोवा राज्य व मे. विजया पॅकेजिंग, प्लॉट नं.१९२/ डी, कुडाईम, गोवा राज्य.)**

सदर नोंदविलेल्या गुन्ह्यामध्ये जप्त केलेले गोवा राज्यात निर्मित बनावट देशी मद्य हे शासनाचा महसूल बुडवून महाराष्ट्र राज्यात आणण्यात आलेले असून अशा बनावट मद्याच्या सेवनामुळे मानवी जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मा. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पूर्वपरवानगी घेऊन तपास पथकाने गोवा राज्यात प्रवेश केला.

Scanned with OKEN Scanner

सोबत असलेल्या आरोपी इसमाकडून मिळालेल्या माहितीनुसार **मे. कॅनस पॅकेजिंग प्रा. लि., घर नं. 62, मरनसपाडा, कुडाईम, गोवा** येथील कंपनी परिसराची पाहणी करण्यात आली. त्यावेळी मारडोल पोलीस स्टेशन येथील पोलीस कर्मचारी व पंच यांच्या उपस्थितीत कंपनीच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश करण्यात आला.

तपासणी दरम्यान प्रिंटिंग मशीन, कटर मशीन, कोरिगेटेड मशीन, स्टिचिंग मशीन, स्कोरिंग मशीन, पंचिंग मशीन तसेच कागदी पुठ्ठे, रोल, देशी व विदेशी मद्याचे रिकामे बॉक्स, विविध कंपनीचे मद्याचे लेबल, बनावट "रॉकेट संत्रा" देशीदारूचे लेबल, चिकट टेप, बनावट दस्तऐवज व इतर साहित्य मिळून आले. तसेच एसर कंपनीचा लॅपटॉप, सीसीटीव्ही डीव्हीआर, प्रिंटर व मॉनिटर अशी संगणकीय उपकरणे देखील आढळून आली.

याशिवाय कंपनीच्या बाजूला असलेल्या खोलीत बनावट मद्य निर्मितीसाठी लागणारे लेबल रोल, चिकट टेपचे बॉक्स, विदेशी मद्याच्या बाटल्यांच्या बुचा तसेच अंदाजे 1800 **लिटर स्पिरीट प्लॅस्टिक बॅरेलमध्ये व 400 लिटर स्पिरीट प्लॅस्टिक कॅनमध्ये** असा मोठ्या प्रमाणावर साठा आढळून आला. सदर सर्व साहित्य हे बनावट मद्य निर्मितीसाठी वापरले जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**गुन्हा स्थळ क्र.३ (मे. कॅनस पॅकेजिंग प्रा.लि.ए-२०४, पंचतारांकित औद्योगिक वसाहत,कागल)**

सदर गुर.क्र.०८/२०२६ दि.१८/०१/२०२६ रोजीच्या गुन्हयाच्या अनुषंगाने पुढील अधीकचा सखोल तपास करण्यासाठी मा.अधीक्षकसो०,कोल्हापूर यांचे आदेशानुसार दि.२२/०१/२०२६ रोजी १७.०० वाजता निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, शाहूवाडी, त्यांचा स्टॉफ व निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,कोल्हापूर शहर त्यांचा स्टॉफ असे सर्वजण मिळून शासकीय वाहनाने मे. कॅनस पॅकेजिंग प्रा.लि.ए-२०४, पंचतारांकित औद्योगिक वसाहत,कागल येथे गेला असता सदर कंपनी बंद स्थितीत मिळून आली. सदर कंपनीचाजागा मालक व मशीन मालक यांचा शोध घेऊन त्याना घटनास्थळी बोलावून घेऊन कंपनीचे प्रवेशद्वार उघडून पाहिले असता, कागदी पुठयाचे बॉक्स तयार करणेचे कोरेगेशन मशीन, वेगवेगळया अवैध देशी दारूच्या जीएम ब्रुवरीज्, प्रवरा रॉकेट, हिदुस्थान डिस्टीलीरीज असे चिकटपट्टीचे एकुण १२४ बॉक्स, आरोपीत इसम संदीप आण्णाप्पा ठिकणे यांचे ताब्यातील विवो कंपनीचा Y४०० मॉडेलचा मोबाईल संच, आरोपीत इसम सचिन आण्णासाहेब बेनाडे यांचे ताब्यातील सॅमसंग कंपनीचा S२४ मॉडेलचा मोबाईल संच असा एकुण २२,१८,८००/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. (बनावट मद्य निर्मिती साठीचे साहित्य)

**गुन्हा स्थळ क्र.४- (मे.हिरण्या पॅकेजींग प्रा.लि.प्लॉट नं.बी-२५,एमआयडीसी गडहिंग्लज जि.कोल्हापूर)**

दिनांक २२/०१/२०२६ रोजी दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,भरारी पथक क्र.२ तथा सहाय्यक तपासी अधिकारी यांनी त्यांचे पथकासह मे.हिरण्या पॅकेजींग प्रा.लि. प्लॉट नं.बी-२५,एमआयडीसी गडहिंग्लज जि.कोल्हापूर या ठिकाणी छापा घातला असता,कागदी पुठयाचे बॉक्स तयार करणेचे आरएस४ प्रिंटींग मशीन, देशीदारू टँगो पंचच्या खाकी रंगाचे कागदी पुठयाचे बॉक्स २००० बंडल, कोकण प्रेमियम खाकी रंगाचे कागदी पुठयाचे बॉक्स १०००० बंडल, जॉन डिस्टलरी खाकी रंगाचे कागदी पुठयाचे बॉक्स १०००० बंडल, देशीदारू टँगो पंचच्या खाकी रंगाचे कागदी पुठयाचे बॉक्स ४५०००० बंडल, देशीदारू रॉकेट संत्राच्या खाकी रंगाचे कागदी पुठयाचे १ बंडल व मोबाईल संचसह एकुण रूपये २४,९५,०१०/- या किमतीचा जप्त करण्यात येऊन जागालक/ कंपनी मालक प्रविण तुकाराम वाईंगडे मुळ रा.सुळे आजरा सध्या रा.टिळक पथ रोड,गडहिंग्लज ता.गडहिंग्लज ता.गडहिंग्लज जि. कोल्हापूर यास अटक करणेत आली आहे. वरील मुद्देमाल पावतीमधील मशीन अवजड असल्याने मुख्यालयास आणणेस सुलभ नाही. कंपनीत सीलबंद करून ठेवण्यात आला आहे. (बनावट मद्य निर्मिती साठीचे साहित्य)

**गुन्हा स्थळ क्र.५- (मे.मोरया लेबल्स् प्रायव्हेट लिमिटेड भांडुप वेस्ट, मुंबई महाराष्ट्र राज्य)**

गु.र.क्र. ०८/२०२६ दि. १८/०१/२०२६ च्या अनुषंगाने दि. २९/०१/२०२६ रोजी मे. मोरया लेबर्स प्रा. लि. भाडूंप वेस्ट मुंबई या ठिकाणी छापा घातला असता सदर ठिकाणी खालील प्रमाणे दिनांक २९/०१/२०२६ रोजी श्री.के.बी.बिरादार निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, शाहूवाडी यांना नियुक्त पथकासह मे.मोरया लेबल्स् प्रायव्हेट

Scanned with OKEN Scanner

लिमिटेड भांडुप वेस्ट, मुंबई महाराष्ट्र राज्य येथे कारवाई करून जॉनपूर प्रिमियम ग्रेन व्हिस्कीचे एकुण १५०० कागदी लेबल्स्, देशीदारू टँगो प्लेटस् (स्टेरिओ) ७ नग,कॅशू फेणी (द गोवण कॅश फेणी) २४०० नग असे ६२,८५०/- इतक्या किंमतीचा मुद्येमालाची मुद्येमालाची पावती करून व इतर गुन्हयाच्या अनुषंगिक कागदपत्रे या कार्यालयाकडे सुपूर्त करण्यात आली आहेत. (बनावट मद्य निर्मिती साठीचे साहित्य)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा स्थळ क्र-१ | देवगड-निपाणी राज्यमार्गावर, आनूर रोड, बस्तवडे फाटा, बस्तवडे ता.कागल जि.कोल्हापूर | ६१,१५,७००/- |
| गुन्हा स्थळ क्र-२ | मे.कॅनस पॅकेजिंग प्रा.लि.,घर नं.६२, मरनसपाडा, कुडाईम, गोवा राज्य व मे.विजया पॅकेजिंग, प्लॉट नं.१९२/ डी, कुडाईम,गोवा राज्य. | २५,५०,८६२/- |
| गुन्हा स्थळ क्र-३ | मे. कॅनस पॅकेजिंग प्रा.लि.ए-२०४, पंचतारांकित औद्योगिक वसाहत,कागल जि.कोल्हापूर | २२,१८,८००/- |
| गुन्हा स्थळ क्र-४ | मे.हिरण्या पॅकेजींग प्रा.लि. प्लॉट नं.बी-२५, एमआयडीसी गडहिंग्लज जि.कोल्हापूर | २४,९५,०१०/- |
| गुन्हा स्थळ क्र- ५ | मे. मोरया लेबल्स् प्रायव्हेट लि.भांडुप वेस्ट, मुंबई महाराष्ट्र | ६२,८५०/- |
| गुन्हा स्थळ क्र. १ ते ५ | Total value of property/Seized Articles (in Rs/-) | १,३४,४३,२२२/- |

सदर गुन्हयातील मोबाईल संच बॉन्डवर परत मिळणेबाबत अर्जदारांनी किरकोळ फौजदारी अर्ज नं.37/2026 नुसार अर्ज सादर केला आहे.

प्रकरणी नम्रपणे सादर करण्यात येते की,

1. सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅडसेट, मोडेल A-55, IMEI NO.352053261743879 हा मोबाईल संच परत केल्यास सदर त्या मोबाईल संचचा वापर पुन्हा अशाच प्रकारच्या गुन्हयात पुन्हा पुन्हा करण्यासाठी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

2. सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅडसेट, मोडेल A-55 ,IMEI NO.352053261743879 हा मोबाईल संच या कार्यालयाकडे सुरक्षित आहे. तसेच मोबाईल संच या कार्यालयाकडे सबळ पुरावा म्हणून जप्त असणे आवश्यक असून तो कार्यालयाच्या मुद्येमाल कक्षात सुरक्षीत ठेवण्यात आला आहे.

3. गुन्हयातील आरोपीत इसमास गुन्हयाची सवय जडलेली असून ते सराईत गुन्हेगार आहेत. तसेच आरोपी हे अशा अवैधरित्या बनावट बॉक्स छपाईचा व्यवसायात कायम आहेत. अर्जदारांना सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेला मोबाईल संच परत दिल्यास अशा प्रकारच्या गुन्हयात वांरवार वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4. गुन्हा रजि.क्र.8/2026 मध्ये जप्त असलेल्या मोबाईल संचच्या माध्यमातून आजूबाजूच्या अवैध धंदेवाल्याना संपर्क करून अवैधरित्या तो बनावट बॉक्सची छपाई करून विक्री करण्याकरीता वाहतूक करीत असल्याने शासकीय महसुलाचा प्रश्न निर्माण झाला असून अशा प्रकारच्या गुन्हयामुळे महाराष्ट्र शासनाच्या मोठया प्रमाणात महसुलाचे नुकसान झाले आहे.

5. सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅडसेट, मोडेल A-55 ,IMEI NO.352053261743879 हा मोबाईल संच या गुन्हयातील सबळ पुरावा म्हणून महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा 1949 चे कलम 132 प्रमाणे या कार्यालयाकडे पुरावा म्हणून कब्जेत असणे आवश्यक वाटते.

6. तसेच सदर गुन्हयातील आरोपीत इसम हे अशा अवैध गुन्हयात कायम असल्याने या गुन्हयात जप्त असलेला मोबाईल संच परत दिल्यास त्याचा वापर पुन्हा पुन्हा अशा अवैद्य व्यवसायासाठी वापर होण्याची शक्यता असलेने गुन्हयातील जप्त असलेला मोबाईल संच (सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅडसेट मोडेल A-55 IMEI NO.352053261743879) हा अर्जदारास हस्तांतर करू नये ही नम्र विनंती.

Scanned with OKEN Scanner

7. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्हा स्थळ म्हणून असलेली **घर नं.1257/1258/2 , टिळक पेठ,बॅक ऑफ बडौदा जवळ असलेली मे. हिरण्या पॅकेजिंग प्रा.लि.कंपनी गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथील** येथे पंचांसमक्ष पंचनामा करून दिनांक 22/01/2026 रोजी सदर कंपनी / कारखाना सिलबंद करण्यात आलेला आहे.

8. **उपरोक्त गुन्ह्याच्या तपासादरम्यान संबंधित ठिकाणी छापा टाकून तपास केला असता तेथे कागदी पुठ्ठ्याचे बॉक्स तयार करण्याचे आरएस-4 प्रिंटिंग मशीन, तसेच देशीदारू "टँगो पंच" या ब्रँडच्या खाकी रंगाच्या कागदी पुठ्ठ्याचे बॉक्सचे 2000 बंडल, कोकण प्रीमियम या ब्रँडचे 10000 बंडल, जॉन डिस्टिलरी या ब्रँडचे 10000 बंडल, तसेच देशीदारू टँगो पंच या ब्रँडचे 450000 बंडल व देशीदारू "रॉकेट संत्रा" या ब्रँडचा खाकी रंगाचा कागदी पुठ्ठ्याचा 1 बंडल, तसेच मोबाईल संच असा एकूण रु. 24,95,010/- किमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमालाचा पंचनामा करून तो मे. हिरण्या पॅकेजिंग प्रा.लि.कंपनी गडहिंग्लज या कंपनीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात कुलूपबंद करण्यात आलेला असून सदर मशनरींचा वापर हा बेकायदेशिररित्या बॉक्स बनवण्यासाठी कोणतीही परवानगी नसताना सदर गुन्हयात वापर झालेला आहे.**

**सदर गुन्ह्याचा तपास अद्याप अपूर्ण असून गुन्ह्याची संपूर्ण उकल होणे बाकी आहे. तसेच सदर कंपनीमधील बॉक्स तयार करण्याचे मशीन व इतर साहित्य हे सदर गुन्ह्यातील महत्त्वाचे भौतिक पुरावे आहेत. त्यामुळे सदर कंपनीवरील सील काढण्यात आल्यास आरोपींकडून सदर पुराव्यामध्ये फेरफार होण्याची अथवा पुरावा नष्ट करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे न्यायालयाने सदर बाबींचा विचार करून कंपनीवरील सील कायम ठेवण्याबाबत योग्य तो आदेश द्यावा, ही विनंती आहे.**

9. सदर गुन्ह्याचा तपास सध्या सुरू असून काही महत्त्वाचे पुरावे गोळा करणे, संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदविणे, आर्थिक व्यवहारांचा तपास करणे तसेच आवश्यक तांत्रिक तपास करणे बाकी आहे.

10. सदर कंपनीचे सिल उघडल्यास गुन्ह्याशी संबंधित महत्त्वाच्या पुराव्यांमध्ये फेरफार होण्याची किंवा ते नष्ट होण्याची शक्यता आहे तसेच तपासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

11. सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅडसेट, मोडेल A-55 ,IMEI NO.352053261743879 हा मोबाईल संच व तात्पुरत्या स्वरूपात कुलूपबंद केलेली **मे. हिरण्या पॅकेजिंग प्रा.लि.कंपनी गडहिंग्लज येथिल मशनरी** या गुन्हयातील सबळ पुरावा म्हणून महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा 1949 चे कलम 132 प्रमाणे या कार्यालयाकडे पुरावा म्हणून कब्जेत असणे आवश्यक वाटते.

12. सदर जागा ही गुन्हा स्थळ असल्याने तपासाच्या दृष्टीने सदर कंपनी सध्या सिलबंद ठेवणे आवश्यक आहे. **त्यामुळे** सदर कंपनीचे सिल सध्या उघडण्यास परवानगी दिल्यास तपासावर विपरीत प्ररिणाम होण्याची शक्यता असल्याने **सदर कंपनीचे सिल उघडण्यास परवानगी देण्यात येवू नये**, अशी मा. न्यायालयास नम्र विनंती आहे.

आपल्या माहितीस्तव व पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

आपला विश्वासू,

(एे.आर.नायकुडे)
तपास अधिकारी तथा,
दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
कागल क्रमांक 3 जि.कोल्हापूर

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.09 15:34:30 +0900

Scanned with OKEN Scanner